गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १५८ वा ● शुक्रवार २७ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 158 | Date : 27/10/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

# गरिबीतून मुक्ती हाच खरा सामाजिक न्याय : प्रधानमंत्री मोदी

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्रातील १४ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण

शिर्डी : गरिबीतून मुक्ती मिळणे आणि गरिबातील गरीब कुटुंबाला पुढे जाण्याची संधी मिळणे हाच खरा सामाजिक न्याय आहे. केंद्र शासनाची सर्वोच्च प्राथमिकता ही गरीब कल्याण आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. महाराष्ट्रातील २६ जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन कटिबद्ध असल्याची ग्वाहीदेखील प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.



शिर्डी विमानतळाजवळ असलेल्या काकडी येथील मैदानावर आयोजित शेतकरी मेळाव्यात आज प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते संगणकीय कळ दाबून महाराष्ट्रातील १४ हजार कोटी रुपयांहून अधिक विकास प्रकल्पांचे भूमीपूजन व लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, कामगार मंत्री सुरेश खाडे, खासदार सदाशिवराव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, खासदार उन्मेष पाटील, आमदार राम शिंदे, आमदार बबनराव पाचपुते, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते. पाच वर्षांपूर्वी शिर्डीत आलो होतो तेव्हा साई शताब्दी वर्ष होते. तेव्हा मला साई दर्शनाची संधी मिळाली होती. असे वाक्य मराठीतून बोलून आपल्या भाषणाला प्रधानमंत्र्यांनी सुरुवात केली. प्रधानमंत्री श्री. मोदी यावेळी म्हणाले की, महाराष्ट्राला पन्नास वर्षांपासून प्रतीक्षा असलेल्या निळवंडे धरणाचे आज जलपूजन करून लोकार्पण झाले. यामुळे या भागातील शेती पाण्याखाली येणार आहेत. पाण्याचा एक - एक थेंब अमूल्य आहे. तेव्हा पाण्याचा जपून वापर झाला पाहिजे, अशी अपेक्षाही प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

श्री साईबाबा मंदिर दर्शन रांगेचे आज लोकार्पण झाले. दर्शन रांग प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे देश - विदेशातील भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

बाबा महाराज सातारकर यांचे आज निधन झाले. त्यांनी कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाज जागृतीचे काम केले, अशा शब्दात त्यांनी यावेळी । पान २ वर

### या विकास प्रकल्पाचे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले उद्घाटन व लोकार्पण

* महाराष्ट्रात 'नमो शेतकरी महासन्मान निधी ' योजनेची ८६ लाख शेतकऱ्यांना १७१२ कोटी रुपयांच्या पहिल्या हप्त्याचे वितरण करून शुभारंभ * शिर्डी येथे भाविकांच्या सुविधेसाठी नवीन दर्शन रांग संकुलाचे उद्घाटन (प्रकल्प खर्च रु. १०९ कोटी) * निळवंडे धरण डाव्या कालव्याचे लोकार्पण (रु.५१७७ कोटी ) * राष्ट्रीय महामार्ग-१६६ च्या सांगली व बोरगाव चौपदरीकरण टप्प्याचे लोकार्पण (रु.११०२ कोटी) * जळगाव ते भुसावळ तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे लोकार्पण (रु.६४० कोटी) * कुर्डूवाडी-लातूर रोड रेल्वे मार्गाचे विद्युतीकरण प्रकल्पाचे लोकार्पण (रु.२३७ कोटी)* मनमाड गॅस टर्मिनल येथे अतिरिक्त सुविधांचा शुभारंभ (रु.२२१ कोटी)* अहमदनगर येथे माता व बाल आरोग्य जिल्हा रूग्णालय भूमिपूजन (रु.२५.४५ कोटी)* राष्ट्रीय आयुष मिशन कार्यक्रमांतर्गत अहमदनगर येथील आयुष रूग्णालय उद्घाटन (रु.९ कोटी)* १.११ कोटी आयुष्यमान कार्ड वितरणाचा शुभारंभ* स्वामित्व योजनेंतर्गत लाभार्थींना सनद वाटप

### ग्रामपंचायत मतदानादिवशी आठवडी बाजार बंद

सोलापूर/प्रतिनिधी: जिल्ह्यातील ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूकीचे मतदान दि.०५ नोव्हेंबर २०२३ रोजी होत आहे. या दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्ह्यातील मतदानाच्या ठिकाणचा आठवडा बाजार भरविण्यास मनाई करण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद निर्गमित केले आहेत.

माढा तालुक्यातील मौजे पिंपळनेर, करमाळा तालुक्यातील मौजे केम, माळशिरस तालुक्यातील मौजे दहिगाव,सांगोला तालुक्यातील मौजे चिकमहुद, मंगळवेढा तालुक्यातील मौजे खुपसंगी या ठिकाणचे आठवडी बाजार बंद करण्याचा आदेश जिल्हाधिकारी आर्शीवाद निर्गमित केले आहेत.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात कायदा सुव्यवस्थाअबाीत राहावी तसेच मतदान प्रक्रिया निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी आठवडी बाजार बंद करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेतला आहे.

## ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांचं निधन



नवी मुंबई : ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांचं निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. नवी मुंबईती नेरूळ इथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बाबा महाराज सातारकर यांच्या पार्थिवावर उद्या शुक्रवारी २७ ऑक्टोबरला संध्याकाळी ५ वाजता नेरुळ येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. दरम्यान, बाबा माहाराज सातारकर यांचं पार्थिव आज दुपारी तीननंतर अंतिम दर्शनासाठी नेरूळ जिमखाना समोर असलेल्या विठ्ठल रुक्मिणी मंदीरात ठेवण्यात येईल. जेष्ठ निरुपणकार बाबा महाराज सातारकर यांनी आपलं आयुष्य अध्यात्माच्या प्रचार प्रसारासाठी अर्पण केलं. रोखठोक वाणी आणि शुद्ध विचार हे बाबा महाराज सातारकर यांचं व्रत होतं. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जनसामान्यांचं प्रबोधन केलं. दरम्यान, यावर्षीच्या सुरुवातीलाच फेब्रुवारी महिन्यात बाबा महाराज सातारकर यांच्या पत्नी रूक्मिणी सातारकर ऊर्फ माई सातारकर यांचं निधन झालं होतं. त्यानंतर ८ महिन्यानंतर बाबा महाराज सातारकर यांचीही प्राणज्योत मालवली. । पान २ वर

## नुकसान भरपाईचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी ३० ऑक्टोबरला शिबीर

सोलापूर/प्रतिनिधी: केंद्र शासनाच्या परियोजनेतर्गंत राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ सी पंढरपूर-सांगोला रोड (भाग-२) रस्त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरु असून, सांगोला तालुक्यामधून संगेवाडी, मांजरी, बामणी या गावांमधून हा महामार्ग जात आहे. या मार्गाच्या बाधितांना भुसंपादन भरपाईचे मागणी प्रस्ताव दाखल करण्यासाठी दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजी संगेवाडी येथे सकाळी ११.०० वाजले पासून शिबीर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती भूसंपादन उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ सी पंढरपूर सांगोला रस्त्यासाठी सांगोला तालुक्यातील संगेवाडी, मांजरी, बामणी या गावातील बाधित गट धारकांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. परंतु सांगोला तालुक्यातील मौजे संगेवाडी या गावचे एकूण ७३ गट धारकांपैकी फक्त १७ गट धारकांनी नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव सादर केलेला आहे. संबधित भुसंपादनाचे नुकसान भरपाई मागणीचे प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन त्यांची त्वरीत तपासणी करुन । पान २ वर

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली आत्मा नियामक मंडळाची बैठक संपन्न

## जिल्ह्यात आत्मा अंतर्गत विविध पिकांचे ४ हजार २२१ गटांची स्थापना



सोलापूर/प्रतिनिधी: कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा अंतर्गत आत्मा नियामक मंडळाची बैठक जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दातत्रय गावसाने, कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे, मोहोळ येथील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. टि.आर.वळकुंडे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत नाशिककर, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक नितीन शेळके, आत्माचे उपसंचालक आर. एस. माळी, आत्माचे संचालक रवींद्र पाठक, बोरामणी शेतकरी उत्पादक संघ प्रतिनिधी श्रीमती अनिता योगेश माळगे, शेतकरी उत्पादक संघाचे नागेश कोकरे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आत्मा चा सन २०२२-२३ राबवलेला कार्यक्रम व लेखापरीक्षण अहवालास मंजुरी, आत्मा सन २०२३- २४ मंजूर आवंटना प्रमाणे जिल्हा वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी, सन २०२३ -२४ माहे सप्टेंबर २३ अखेर प्रगती व नियोजन, आत्मा अंतर्गत संलग्न विभाग विस्तार प्रकल्पास मंजुरी, स्मार्ट योजना आढावा, सेंद्रिय शेती, डॉक्टर पंजाब देशमुख जैविक शेती मिशन आढावा या विषयांचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

आत्मा अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात १० हजार शेतकरी गट स्थापन करण्याचे उद्दिष्ट असून सप्टेंबर अखेर विविध पिकांचे ४ हजार २२१ शेतकरी गटांची स्थापना झालेली आहे. तरी उर्वरित शेतकरी गटाची स्थापना करण्यासाठी आत्माने प्रयत्न करावेत, यासाठी प्रत्येक गावात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधावा व त्यांना शेतकरी गटाचे महत्त्व पटवून द्यावे अशी सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली.

जिल्ह्यात सेंद्रिय शेती योजना राबवण्यासाठी मोठा वाव असून यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना विषमुक्त अन्न मिळणार आहे. या योजनेतून स्थानिक व राष्ट्रीय बाजारपेठे सह थेट बाजार साखळी द्वारे शेतकरी उद्योजक तयार करण्यासाठी आत्मा ने प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.प्रारंभी आत्माचे प्रकल्प संचालक रवींद्र पाठक यांनी आत्मा नियमक मंडळाद्वारे करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत सादर केली. तसेच जिल्ह्यात दहा हजार शेतकरी गट स्थापन करण्याचे उद्दिष्ट असून त्या दिशेने आत्महत्या वतीने प्रयत्न करण्यात येत असून आत्तापर्यंत ४००० पेक्षा अधिक शेतकरी गटाची स्थापना झालेली असून सोलापूर जिल्ह्याचे उद्दिष्ट पूर्ण होईल, असे त्यांनी सांगितले. आत्मा च्या वतीने शेतकऱ्यांना व शेतकऱ्यांच्या गटांना स्थानिक, तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवर विविध अद्यावत व नैसर्गिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये शेतकरी उत्साहाने सहभागी होऊन त्या प्रशिक्षणाची अंमलबजावणी शेती उत्पादन वाढीसाठी करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बसचा भीषण अपघात; दोन जणांचा मृत्यू तर १६ जण किरकोळ जखमी

पुणे : पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बस अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू तर १६ जण किरकोळ जखमी झाले. दौंड तालुक्यातील पाटसमध्ये पहाटे ५ ते ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. उमरगाहून पुण्याकडे निघालेल्या खाजगी लक्झरी बस उभ्या असलेल्या ट्रकला धकडली. टायर फुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या जखमींना पाटस, दौंड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलवले आहे. या अपघातात लक्झरी बसचा पुढील भाग चक्काचूर झाला आहे. तर सिमेंट मालवाहतूक करणाऱ्या वाहनांमधील सिमेंट मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर पडल्याने मोठे नुकसान झाले आहे.



## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने अक्कलकोट ग्रामीणसह शहरात भव्य पथसंचलन

अक्कलकोट/प्रतिनिधी: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने अक्कलकोट शहरात भव्य पथसंचलन विजयादशमीनिमित्त काढण्यात आले. विठ्ठल मंदिरजवळील श्रीमंत कमलाराजे चौक येथून पथसंचालनाची सुरुवात करण्यात आली. या पथसंचालनात संघाचा गणवेश घातलेले स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तसेच अर्ध गणवेश व नागरी वेशातसुद्धा स्वयंसेवक सामील झालेले होते. हे संचलन नगरपालिकामार्गे विजय कामगार चौक,एसटी बस स्टॅन्ड, श्री मल्लिकार्जुन मंदिर,समाधी मठ,कारंजा चौक,मौलाली गल्ली, आझाद गल्ली,डबरे गल्ली,देशमुख गल्ली,भारत गल्ली,राम गल्ली, मधला मारुती,सुभाष गल्ली,दक्षिण पोलीस ठाण्यासमोरून कापड लाईन,स्वा.सावरकर चौक,समर्थ चौक,राजे फत्तेसिंह चौक,जुना तहसील कार्यालय समोरून उखले गल्ली मार्गे श्रीमंत कमलाराजे चौकात समारोप करण्यात आला.



अक्कलकोट शहरासह तडवळ, आळगी ,मैंदर्गी या ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन, शेकडो स्वयंसेवक सामील झाले होते. प्रारंभी संचालनाच्या सर्व सूचना तालुका कार्यवाह चेतन जाधव यांनी उपस्थित स्वयंसेवकांना दिल्या. संचनात शिस्तबद्ध स्वयंसेवक,संघाचा घोष हे संचालनाचे वैशिष्ट्य ठरले. शहरात अनेक ठिकाणी व प्रमुख मार्गावर गुलाबपुष्पांचा वर्षाव करून स्वागत करण्यात येत होते. रस्त्याच्या दुतर्फा नागरिक थांबून संचलन पाहत होते. या संचलनात सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे,जिल्हा व्यवस्था प्रमुख उमाकांत चाफेकर, जिल्हा प्रचारक सुशांत पांडकर, धर्मजागरण विभागाचे जिल्हा संयोजक प्रसाद हारकुड,जिल्ह्याचे बौद्धिक प्रमुख संतोष वगाले, तालुका संघचालक रवींद्र जोशी,तालुका कार्यवाह चेतन जाधव,ज्येष्ठ स्वयंसेवक गुंडूअण्णा येळमेली,राजु कोरे,चंद्रकांत जकापुरे,आनंद देसाई,सायबन्ना सोनकांबळे,बसवराज साखरे,शिवशंकर स्वामी,समर्थ देशमुख,मिलिंद पाटील,सुभाष सुरवसे,राजशेखर उंबराणीकर,नीलकंठ कापसे,रमेश कापसे,विलास कोरे,महेश वागदारे,संदीप कटकधोंड, आदित्य जोशी,ओंकार पाठक,अक्षय सरदेशमुख,रेवणसिद्ध हिरेमठ, तम्मा शेळके,महेश शेडम,आमदार सचिन कल्याणशेट्टी। पान २ वर

दैनिक यश सिद्धी न्यूज
● संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.9921988358 ●

सुवर्णसंधी

लेखक/कवि/साहित्यक/विचावंत यांना सुवर्णसंधी
दैनिक यशसिध्दी न्यूज या वृत्तपत्राच्या दिवाळी विशेषांकामध्ये
आपले लेख/कविता/इतर साहित्य प्रकाशनासाठी संपर्क मो.९९२१९८८३५८ साधावा.

: संपादक :
कमलाकर सोनकांबळे

www.yashsiddhinews.com
Epepar-yashsiddhinews.com
टिप : दिवाळी अंक हा पुस्तक स्वरुपात असेल...

# दीक्षाभूमी : जातीय द्वेषातून केलेली याचिका अखेर कोर्टाने केली रद्द

नागपूर : दीक्षाभूमी येथे देशाच्या तसेच जगाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या धम्म अनुयायी पुस्तकप्रेमी अभ्यासक यांच्या विरोधात चुकीचे आरोप लावत करण्यात आलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावत रद्द केली आहे.धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त स्थानिकांना भेडसावणाऱ्या वाहतुकीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी दाखल करण्यात आलेली जनहित याचिका (पीआयएल) 'अप्रासंगिक' असल्याचे सांगून, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २५ ऑक्टोबर २०२३ बुधवारी फेटाळून लावली. 'अविनाश विष्णुपंत काळे वि. युनियन ऑफ इंडिया आणि इतर' . धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून राज्याच्या दुसऱ्या राजधानीत मोठ्यासंख्येने प्रवास करणाऱ्या लोकांमुळे गैरसोय होत असल्याचा दावा करत याचिकाकर्ते अविनाश विष्णुपंत काळे यांनी जनहित याचिका दाखल केली होती.



या संदर्भात ॲड. अविनाश काळे यांच्या तर्फे ॲड कळमकर यांनी बाजू मांडली तर रेल्वे तर्फे सौरभ चौधरी, तसेच मध्यस्ती अर्ज सादर करणारे अनिकेत कुत्तरमारे, वैभव कांबळे, आशिष फुलझेले, सिद्धांत पाटील यांच्या वतीने ऍड. पायल गायकवाड व ॲड. राहुल तेलंग,दीक्षाभूमी स्मारक समिती तर्फे ॲड. शैलेश नारनवरे यांनी बाजू मांडली. दीक्षाभूमी वर भेट देण्यासाठी जाणाऱ्या अनुयायांच्या विरोधातील ही याचिका अप्रासंगिक सांगून रद्द केली. याचिकेच्या संदर्भात न्यायालयाने विचारलं की, रेल्वे व इतर प्रशासनाद्वारा योग्य त्या सुविधा पुरविल्या जातात काय?

यावर सौरभ चौधरी यांच्याकडून सकारात्मक उत्तर देण्यात आले. यावेळी ॲड. पायल गायकवाड यांनी आपल्या युक्तिवादात सांगितले की, याचककर्त्यांनी गुंडशाही आणि झुंडशाही हे शब्द केवळ आकसापोटी वापरले आहेत. ६७ वर्षाच्या धम्मचक्र प्रवर्तन कार्यक्रमात मोठ्या संख्येने अनुयायी शिस्तीने दीक्षाभूमीला येत असतात.आजवर एकही अपघात, पोलीस तक्रार, चेंगराचेंगरीची घटना इथे झालेली नाही हे आंबेडकरी अनुयायांमध्ये असणारी स्वयंशिस्त दाखवते. सदर याचिका ही केवळ जातीय मानसिकतेतून टाकण्यात आली आहे. ॲड. तेलंग यांनी बाजू मांडताना म्हटलं की, याचिका कोणत्याही प्रकारे प्रासंगिक नाही. दीक्षाभूमी तर्फे ॲड. शैलेश नारनवरे यांनी सांगितले कि याचिका ही एका संकुचित मानसिकतेतून टाकण्यात आली आहे व एका व्यक्तीचा त्रास हा सगळ्यांचा त्रास कसा गृहीत धरला जाऊ शकतो? तेव्हा हि याचिका रद्द करण्यात यावी. सर्व प्रकारचे दावे समजून न्यायालयाने दीक्षाभूमी वर भेट देण्यासाठी जाणाऱ्या अनुयायांच्या विरोधातील ही याचिका अप्रासंगिक सांगून रद्द केली आहे. सदर खटला रद्द झाल्यानंतर स्पष्ट होते की संकुचित आणि एका विशिष्ट्य जातीबद्दल असलेला द्वेष दाखवणारी ही याचिका करण्यात आली होती,मात्र,हा विजय आंबेडकरी जनतेची शिस्त,अनुशासन आणि वैचारिक बुद्धीवादाचा विजय असल्याचं मत अनिकेत कुत्तरमारे, वैभव कांबळे, सिद्धांत पाटील, आशिष फुलझेले, पायल गायकवाड, आणि ॲड राहुल तेलंग यांनी यानंतर जाहीर करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# व्यक्तीमत्व विकासाला बौद्ध धम्मात महत्त्वाचे स्थान : धम्मचारी रत्नपालीत



वागदरी / एस.के.गायकवाड : मानवतेची शिकवण देणारा तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बौद्ध धम्मात व्यक्तीमत्व विकासाला महत्त्वाचे स्थान आहे म्हणूनच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या उध्दाराठी कर्मकांडमुक्त स्वाभिमानाने जिवन जगण्यासाठी बौद्ध धम्म दिला आहे.तेंव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विचारांचे प्रत्यक्ष आचरण करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन त्रिरत्न बुद्धीस्ट सेंटरचे चेअरमन धम्मचारी रत्नपालीत यांनी दस्तापूर (अष्टामोड )ता.लोहारा येथील बौद्ध विहारात आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

पंचशील बौद्ध विहार ट्रस्ट व विपश्यना केंद्र दस्तापूर (अष्टामोड) ता.लोहारा यांच्या वतीने ६७ व्या धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी दस्तापूर ते अष्टामोड पंचशील बौद्ध विहारा पर्यंत समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने धम्म रँली काढण्यात आली. या धम्म रँलीची बौद्ध विहाराच्या प्रागंणात सांगता करून या बौद्ध विहारासाठी चार गुंटे जमीन दान देणारे दान दाते रमेश गायकवाड व बौद्ध विहार कमिटीचे अध्यक्ष अरूण लोखंडे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करून परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारूती बनसोडे, रिपाइं (आठवले)चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड, अँड. शांतीबल कांबळे, अँड .विद्यसागर ढोबळे,धम्मचारी कांबळे सर जेवळी आदीच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुहिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. याप्रसंगी धम्मचारी रत्नपालीत यांच्या धम्म प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहशिक्षक धम्ममित्र महादेव भोसले व सहशिक्षक तथा बौद्ध विहार कमिटीचे सचिव रवींद्र डावरे यांनी केले. तर आभारप्रदर्शन विहार कमिटीचे अध्यक्ष अरुण लोखंडे यांनी केले.

यावेळी त्रिरत्न बुदीस्ट सेंटरचे धम्मचारी ज्ञानपालीत,धम्मचारी धम्मभूषण,धम्मचारी प्रज्ञाजीत,धम्ममित्र विबोध, जी एल कांबळे पंचशील बुद्ध विहार कमिटीचे संचालक विनोद डावरे अंबादास डावरे शंशीकांत डावरे मेढेताई धोडाबाई डावरे प.स.माजी सदस्य वामन डावरे,हरिष डावरे,किशोर डावरे,सचीन सुरवसे,सचीन डावरे,गजेंद्र डावरे,सतीश माने,आर.एस.गायकवाड, कैलास गवळी गुरुजी,अरविंद लोखंडे,शामकांत नागीले,गायकवाड प्रबुद्ध मित्र मंडळाचे विशाल डावरे, आशिष कावरे,मनोज गायकवाड,सुरज डावरे,सुरज हरीष डावरे,बाबासाहेब सुर्यवंशी श,अमीत डावरे नानासाहेब डावरे,सुदर्शन डावरे,अशोक गायकवाड,भोजन दान करणारे गौतम डावरे सह जळकोट नंदगाव तुगाव भोसगा जेवळी उमरगा चिचोली अणदूर सराटी आदी गावातील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्यने उपस्थित होते

# विबोधी फौंडेशन मुंबई यांच्या कडून शैक्षणिक साहित्य वाटप


अक्कलकोट/प्रतिनिधी: जि.प.प्राथ.मराठी शाळा शिवाजी नगर दुधनी येथील ई.चौथीत शिकणारी विद्यार्थीनी कु.विबोधी वैभव यादव यांचे पालक शाळेस भेट दिली विबोधी हिने आज कला सादर केली,वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी कु.विबोधी हिने नृत्य, गायन,वकृत्व अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली आहे मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिल्यास त्यातून उद्याचे मोठे कलाकार घडू शकतात कु.विबोधीच्या कलागुणांना तिच्या पालकांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे इतक्या कमी वयात ति विविध क्षेत्रात चमक दाखवत आहे, तिची वाटचाल ईतर मुलासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल अशा शुभेच्छा पत्र देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्कार केले.तसेच उपमुख्यमंत्री मा.अजित पवार साहेब ,शिक्षणमंत्री मा.दिपक केसरकर हसन मुश्रीफ यांनीही शुभेच्छा संदेश पत्र पाठवले. विबोधी फौंडेशन मुंबई यांच्या वतीने मुलांना शैक्षणिक साहित्य बॅग वाटप करण्यात आले. तिच्या पालकांच्या उपस्थितीत तिने आपली कला सादर केली.शाळेकडून सत्कार करण्यात आले. मुख्याध्यापक पोमू राठोड बोलतांना म्हणाले विबोधीमुळे शाळेतील इतर मुलांना सुध्दा फायदा होईल तो फायदा निश्चित करून घेऊ व तिच्या पालकांनी दिलेल्या



प्रोत्साहनामुळे इतक्या कमी वयात ति विविध क्षेत्रात चमक दाखवत आहे. आपल्या शाळेचेहि नावलौकिक होईल असे गौरोद्गार काढले. यावेळी सेवानिवृत्त पोलिस सहा. आयुक्त मोतीचंद राठोड यांच्या कडून चित्रकला साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी विबोधी फौंडेशनचे सर्वेसर्वा वर्षा यादव, वैभव यादव,वागदरि सर सहशिक्षक अजय चव्हाण व मुख्याध्यापक पोमू राठोड उपस्थित होते.

# सौ.रत्ना घनघाव अस्नोली ग्रामपंचायत वर बिनविरोध

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे :शहापूर तालुक्यातील अस्नोली ग्रामपंचायतवर सौ. रत्ना अशोक घनघाव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महिला वर्गाचा सक्रिय राजकारणातील सहभाग समाजात काहीतरी आमूलाग्र बदल नक्कीच घडवू शकता आणि अशाच बदलाची नांदी म्हणून अस्नोली ग्रामपंचायत नावारूपाला येत आहे. सौ. रत्ना घनघाव यांना ग्रामपंचायत वर बिनविरोध निवडून देऊन गावातील गावकर्यांनी एक आगळा पायंडा रचला आहे.



सामाजिक उपक्रमाची यथोचित अमलबजावणी करित विधायक कार्य सौ. घनघाव यांच्या हातून पार पडतील अशी अपेक्षा गावकर्यांनी व्यक्त केली आहे.


अस्नोली ग्रामपंचायत वर महिला उमेदवाराला बिनविरोध निवडून देणे सामाजिक सलोखा व एकतेचे दयोतक असल्याची भावना सौ. घनघाव यांनी व्यक्त केली असून त्यांनी या प्रसंगी समस्त गावकर्यांचे मनोमन आभार मानले आहेत.. अस्नोली आणि पंचक्रोशीतील नागरिकांकडून सौ. रत्ना घनघाव यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा देण्यात येत आहे.

# कवी नारायण गाडेकरयांच्या शब्दसुगंध काव्यसंग्राचे प्रकाशन

ठाणे/आशा रणखांब : सतत दुसऱ्यांसाठी कार्यरत असणाऱ्या पोलिसांमध्ये प्रचंड प्रतिभाशक्ती आहे.चोवीस तास कार्यमग्न असल्यामुळे अनेक पोलीस व्यक्त होत नाहीत. पोलीस खात्यातील कवी नारायण गाडेकर यांच्यासारखे काहीजण मात्र कवितेतून व्यक्त होतात. अश्यावेळी त्यांच्या प्रतिभाशक्तीला समजून घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे.असे आवाहन कवी अरुण म्हात्रे यांनी व्यक्त केले. शारदा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या

कवी नारायण निवृत्ती गाडेकर यांच्या शब्दसुगंध या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहोळ्यात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उप आयुक्त पुरुषोत्तम कराड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे , कवी नारायण गाडेकर, प्रकाशक डॉ. संतोष राणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या काळात पोलिसांनी स्वतःच्या जीवाजी बाजी लावून आपल्या सगळ्यांची काळजी घेतली. उन्हातान्हात ,पावसात कश्याचीही पर्वा न करता पोलीस आपली सर्वांची काळजी घेत होते. अनेक पोलीस संवेदनशील असून ते मनातल्या मनात व्यक्त होत असतात.अश्या प्रतिभावंत पोलिसांची प्रतिभाशक्ती समजून घ्यायला हवी. पोलीस खात्यात अनेक अधिका ऱ्यांनी कथा,कविता, कादंबरी ,आत्मचरित्र



असे विविध साहित्यप्रकार लिहून स्वतःला व्यक्त केले आहे. कवी नारायण गाडेकर यांना कविता समजलेली असून अतिशय नेमक्या शब्दात त्यांनी स्वतःला व्यक्त केले आहे.या कवितासंग्रहामुळे पोलीस खात्यात चैतन्य निर्माण होईल. पोलीस खात्यातील लेखक - कवीना बळ मिळेल ,असा मला विश्वास वाटतो.

मनोगत व्यक्त करताना कवी नारायण गाडेकर म्हणाले, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे.त्यामुळे मातीचे दुःख मला शेतात राबताना कळले. पाऊस आला नाही म्हणून माझ्या वडिलांच्या डोळ्यात अश्रूंचा पाऊस मी पाहिला. त्याचवेळी माझ्या कवितेने जन्म घेतला. पोलीस खात्यात असल्यामुळे समाजाच्या वेदना ,दुःख अधिक संवेदनशिलपणे कागदावर उतरवू शकलो. माझे कौतुक करणारे वरिष्ठ, सत्याच्या वाटेवर चालायला शिकविणारे आईवडील, आणि माझ्यातील कवीला जपणारी पत्नी यांच्यामुळे मी इथपर्यंत पोहोचू शकलो.यावेळी स्वर्गीय निवृत्ती गाडेकर यांच्या स्मरणार्थ डॉ. प्रकाश जंगले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर लेखक अमोल मोहन निरगुडे यांना साहित्य सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अस्मिता येंडे यांनी सूत्रसंचालन् केले तर डॉ.संतोष राणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.या प्रकाशन सोहळ्यास पोलीस खात्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# महिलानी धम्म चळवळीत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे : झेंडारे

वागदरी/एस.के.गायकवाड : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना स्वाभिमानाने जगण्यासाठी बौद्ध धम्म दिला असून ग्रामीण भागात धम्म चळवळ गतीमान करण्यासाठी महिलानी धम्म कार्यात सक्रिय सहभाग घेऊन




आठवड्यातून एकदा बौद्ध विहारात जावून बुद्ध वंदना घेतली पाहिजे असे प्रतिपादन क्रषी सखी कोमल लक्ष्मण झेंडारे यांनी वागदरी ता.तुळजापूर येथे बोलताना केले. पंचशील बुध्द विहार कमिटी वागदरी व समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने ६७ व्या धम्म चक्र प्रर्वतन दिनाच्या वतीने येथील पंचशील बुध्द विहारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोमल झेंडारे बोलत होत्या.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुहिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन पंचशील बुद्ध विहार कमिटी चे सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले. यावेळी जेष्ठ कार्यकर्ते मोहन वाघमारे, कुंडलिक वाघमारे,पांडुरंग बनसोडे,युवा कार्यकर्ते लक्ष्मण झेंडारे,

मुकेश धाडवे, सुर्यकांत वाघमारे,माजी उपसरपंच मुक्ताबाई वाघमारे, कविता गायकवाड,श्रीदेवी महादेव वाघमारे,शकुंतलाबाई वाघमारे,कमलबाई धाडवे,स्वाती गायकवाड,बाई भागवत वाघमारे, ठकुबाई वाघमारे,सह विद्यार्थी, महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

# बोरी धरणाच्या पाण्यासाठी कृष्णात मोरे यांचे उपोषण



वागदरी/ एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोट गावाला खंडाळा धरणातून पाणीपुरवठा न करता बोरी धरणातून पाणीपुरवठा योजना आखली जावी . या मागणीसाठी दि.२५(बुधवार) रोजी जळकोट ग्रामपंचायत कार्यालयासमोर शिवसेना तालुका उपप्रमुख कृष्णात मोरे यांनी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. प्रथमताहा शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळयाचे पुजन करण्यात आले व त्यानंतर उपोषणाला सुरुवात करण्यात आले .दरम्यान उपोषणकर्त्याची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन, या मागणीच्या पाठपुराव्यासाठी ग्रामसभेचा ठराव कार्यालयाला देण्यात यावे. असे लेखी पत्र दिले. येत्या १५ दिवसात हा प्रश्न मार्गी लावले जाईल.असे लेखी आश्वासन दिल्यानंतर दुपारी दोन वाजता उपोषण मागे घेतले.

उपोषणकर्त्याची भीमाशंकर हासुरे, सरदारसिंग ठाकूर, प्रदीप जोशी, उपसरपंच प्रशांत नवगिरे,महेश कदम, गजेंद्र पाटील, संजय माने, संजय अंगुले,अनिल छत्रे, अंकुश लोखंडे, राजू पाटील, अर्जून कदम, संतोष वाघमारे, हणमंत सुरवसे, सय्यद ताबोळी, एरन्ना स्वन्ने, बबन मोरे, नागनाथ किलजे, सदाशिव हासूरे, वसंत करदुरे, बसवराज भोगे, हणमंत अंगुले, शशीकांत औसेकर, तुकाराम कुंभार, अंकुश मुडबे, महादेव डांगे, सुनिल छत्रे, डी. डी.कदम, बालाजी माळी, इटकरी, समीर पटेल, बाळू जाधव, नसीर इनामदार महाराष्ट्र पत्रकार संघाचे ता . अरुण लोखंडे सह आदींनी भेट देऊन पाठिंबा दिला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता एन. एन. भोई, उपविभागीय अभियंता सुजित जाधव, शाखा अभियंता के.एस . जाधव, रोहित जाधव यांनी उपोषणकर्त्याची भेट घेऊन लेखी पत्र दिले.

# अम्मा सुवर्णा लक्ष्मी फाउंडेशनच्या दांडिया कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त अक्कलकोट शहर व परिसरातील महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ऐक व्यासपीठ अम्मा सुवर्णा लक्ष्मी फाउंडेशनने तयार करून दिली हे खरेखर कौतुकास्पद आहे असे मत अक्कलकोट शहरातील इंडियन मॉडेल स्कूलच्या मैदानात आयोजित दांडिया कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी चपळगावच्या सरपंच वर्षाताई भंडारकवठे त्या बोलत होत्या यावेळी व्यासपीठावर लक्ष्मीताई कवठे, लिनेस क्लबच्या अध्यक्षा प्रविणा सोळंखो, अम्मा सुवर्णा-लक्ष्मी फाउंडेशनच्या अध्यक्षा लक्ष्मीताई म्हेत्रे, फाउंडेशनच्या सचिवा शितलताई म्हेत्रे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका गोरो दातार मॅडम यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.अम्मा सुवर्णा-लक्ष्मी फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दांडिया कार्यक्रमात अक्कलकोट शहरासह ग्रामीण भागातील युवती व महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवत मोठ्या उत्साहात



पारंपारिक वेशभूषेत दांडिया नृत्याचे बहारदार सादरीकरण करत आनंद लुटले

या कार्यक्रमात दांडिया, गरबा, सोलो-ड्युएट जनरल दांडिया ,असे गट होते. सर्व प्रकारच्या गटामध्ये महिला व युवती ने नॉनस्टॉप म्युझिकल लेझर लाईटमध्ये डीजेच्या तालावर बहारदार दांडिया व गरबाच्या नृत्याचे सादरीकरण करत आनंद लुटले.तुबा बागवान, समृध्दी शहा, मनिषा क्षीरसागर, कल्पना हिरेमठ, प्रविणा सोळंखो, पूजा होटकर यांनी क्रमांक पटकाविले. सर्व गटातील विजेत्या स्पर्धकाला अम्मा सुवर्णा-लक्ष्मी फाउंडेशनच्या अध्यक्षा लक्ष्मीताई म्हेत्रे, लक्ष्मीताई कवठे, सचिवा शितलताई म्हेत्रे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका गौरी दातार मॅडम यांच्या हस्ते रोख व वस्तु स्वरूपात बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेचे परिक्षक म्हणून सलोनी शहा, केतकी नखाते, अंजली पडवळकर यांनी काम पाहिले तर दांडिया कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे, कृष्णा देशपांडे, दयानंद दणुरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## हजरत सय्यद.शाह ताहेर दस्तगीर पीर दर्गा उर्सास प्रारंभ



अक्कलकोट/सोहेल फरास : येथील प्रसिद्ध हजरत सय्यद.शाह दस्तगीर पीर दर्गा यांचा सालादाप्रमाणे यंदा २९८ वा ऊर्स गुरुवार दिनांक २६ ते २८ ऑक्टोबर पर्यंत मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. गुरुवार दिनांक २६ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजता संघर्ष भव्य मिरवणूक सज्जादानशिन व सोल ट्रस्टी सय्यद शाह सिराजपाशा उर्फ नवाबपाशा स.मुस्तफा कादरी यांच्या निवासस्थानापासून निघून दर्गा येथे सज्जादा साहेब यांच्या हस्ते (संदल) गंधार्पण व प्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे.

शुक्रवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी चिराग (दीप)असून त्यानिमित्त दर्गात व दर्गा परिसरात मोठ्या प्रमाणात विद्युत रोशनाई शनिवार २८ रोजी सकाळी दहा वाजता दर्ग्यात कुराण पठणाचा कार्यक्रम महोऊन भक्त लोकांना प्रसादाचे वाटप करून उरूसाचा सांगता समारंभ होणार असल्याचे ट्रस्टी सय्यद शाह सिराजपाशा उर्फ नवाबपाशा स.मुस्तफा कादरी यांनी सांगितले.

## युवकांच्या हातात परिवर्तनाची ताकद, युवकांना खोटे आश्वासने देणाऱ्या भाजपला आगामी निवडणुकीत त्यांची जागा दाखवा :आ.शिंदे

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर शहर युवक काँग्रेसच्या वतीने सोलापूर लोकसभा निवडणुक पूर्वतयारीसाठी आढावा बैठक अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्या आमदार प्रणिती ताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार प्रणिती ताई शिंदे म्हणाल्या कि, थोड्याच दिवसात निवडणुका लागणार आहेत खोटे आश्वासने देणारे पुन्हा एकदा आपल्याकडे येणार आहेत पण त्यांना व युवकांना, जनतेला या अगोदर दिलेले आश्वासनाची आठवण करून दया. रोजगार, महागाई, विकास, धोरणे सर्वच क्षेत्रात मोदी सरकार अपयशी ठरली आहे हे जनतेला दाखवून दया. तसेच सोलापुरचा विस्कळीत पाणी पुरवठा, महापालिकेतिल भोंगळ कार्यभार आदिमुळे लोक काँग्रेसकडे आशेने बघत आहे. २०१४ पर्यंत अगोदर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या जोरावर अनेक निवडणुका जिंकल्या आहेत.आगामी निवडणुकीत युवकांवर मोठी जबाबदारी असून युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नव्या उत्साहाने काम करत नवीन मतदार नोंदणी करून त्यांना समजावून सांगून बूथ यंत्रणा सक्षम करा.तरच आगामी निवडणुकीत आपण सक्षमपणे निवडणुकीच्या सामोरे जाऊ शकतो.असेही ते म्हणाले.

यावेळी सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, शहर काँग्रेस कमिटी प्रवक्ते अशोक निंबर्गी,काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष मनोज यलगुवार,माजी नगरसेवक विनोद भोसले,माजी युवक अध्यक्ष अंबादास करगुळे, प्रदेश सचिव श्रीकांत वाडेकर,अनंत म्हेत्रे,प्रवीण जाधव, मध्य विधानसभा अध्यक्ष वाहिद बिजापूरे,उत्तर विधानसभा अध्यक्ष महेश लोंढे, दक्षिण विधानसभा अध्यक्ष महेश जोकारे,सोशल मीडिया प्रमुख तिरुपती परकीपंडला,मागासवर्गीय सेल अध्यक्ष मयूर खरात,एन.एस.यु. आय अध्यक्ष नागेश म्याकल, प्रवीण वाले, विवेक कन्ना,सुनील सारंगी,धीरज खंदारे,शरद गुमटे, जितू वाडेकर,शुभम माने,गणेश साळुंखे, सुशीलकुमार म्हेत्रे, बशीर शेख,आकाश जाभंळे,युवराज जाधव,महेंद्र शिंदे, दाऊद नदाफ,शिवशंकर अंजनाळकर,आशुतोष वाले,शशिकांत शेळके,प्रतीक शिंगे,गेनसिद्ध शेंडगे,मनोज आदटराव, समीर काझी, उमेर बेन्नोशीरुर, संजय गायकवाड,अनिल अंजनाळकर,शिवराज बिराजदार,गणेश वाघमारे,रोहन साठे,यासार सय्यद, श्रीकांत उडासे,सचिन तिकटे,अजिंक्य पाटील,असलम शेख, किरण राठोड,संदेश कांबळे,बबलू जाधव, मनोहर चकोलेकर,प्रतीक




आबुटे, चेतन जंगम,सुभाष वाघमारे, सुरज कांबळे,आदित्य म्हमाणे,नासिर शेख,सरफराज शेख,मुबारक मकानदार,निखिल पवार,गणेश वाघमारे,सचिन घारे,चंद्रकांत नाईक,दिनेश डोंगरे, गुलाब शेख,ईश्वर यादव, श्रीशैल रणखांबे,समाधान व्हटकर,अनिकेत भिसे,युवराज दोडमणी,धनु स्वामी,प्रेम स्वामी,अक्षय वाडेकर, सुशांत सोकुलू, भैय्या वाडेकर,गणेश देवसानी,अमोल माशाळे,रफिक शेख, सिद्धाराम देशमुख,राजू तांबोळी, सुनील व्हनमाने,बापू कोरे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाळुंग येथे रिपाइं आठवले पक्षाच्या वतीने आंदोलन




श्रीपुर/प्रतिनिधी : माळशिरस तालुक्यातील महाळुंग येथे रिपाइं आठवले युवक आघाडीच्या वतीने शामराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व सुधीर भोसले यांच्या नेतृत्वात महाळुंग श्रीपुर नगरपंचायत कार्यालया समोर महाळुंग प्रभाग क्रमांक ५ येथे नाल्याचे काम व सिमेंट पाईप टाकणे तसेच गावठाण मधील विविध विकास कामे करण्या बाबत आमरण उपोषण करण्यात आले. त्या वेळेस चालु असणारे उपोषण नगरपंचायतच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले आंदोलनाची दखल घेऊन तातडीने कामांना सुरूवातही करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष व नगरपंचायत कर्मचारी तसेच आर.पी.आय तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे जिल्ह्याचे नेते भारतनाना आठवले, जेष्ठ नेते तुकाराम बाबर ,वंचितचे माढा लोकसभा अध्यक्ष संदिप घाडगे, सातपुते मामा, तालुका उपाध्यक्ष माऊली भोसले ,श्रीपुर शहर अध्यक्ष गणेश सावंत, सरचिटणीस विश्वजीत भालशंकर, पत्रकार गोविंद भोसले, सचिन भोसले,वाल्मिक भोसले, किरन भोसले, नागेश भोसले, सोमनाथ भोसले, बंडाभाऊ भोसले, दत्ता भोसले, लोदम भोसले, आकाश भोसले, साधन शिंदे, निलेश भोसले, समिर भोसले, राजकुमार यादव, गुलशन मंडले, अनिल सरवदे, राजु सरवदे, लोखंडे गोपाळ भोसले, कांतिलाल भोसले, युवराज भोसले, मिलींद सरवदे, भोलेनाथ भोसले, आनंद केंगार, आदित्य बनसोडे, कान्हा यादव, सरतापे महाळुंग श्रीपुर येथील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते .

## दुधनी येथे मुख्याधिकार्यांचा दुर्लक्षामुळे डेंग्यु सदृष्य आजार : गोरख धोडमनी

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी हद्दीत विषारी जंतु व दुषित पाण्यामुळे डेंग्यु सारख्या आजार पसरत आहे.वारंवार मुख्याधिकार्यांचा निदर्शनास आणून देखील मुद्दाम दुर्लक्ष केल्याचे आरोप रिपब्लिकन पक्ष(आठवले गट)चे दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी यांनी केली आहे.

दुधनीत आज रिपाइं कडून जंतुनाशक औषधांचे फवारणी करण्याबाबत मुख्याधिकार्यांचा अनुपस्थितीत कार्यालय अधीक्षक चिदानंद कोळी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे. या निवेदनात दुधनी तील अनेक भेडसावणारा विषयावर ही चर्चा करुन सामान्य नागरीकांना सुविधा पुरविण्यात यावे.असेही मागणी रिपाइं कडून केली आहे. दुधनीतील पिण्याचे पाणी व गटारीचे पाणी एकाच नाल्यातून जात आहे.व वाटर सप्लाय चे पाईप अत्यंत निकृष्ठ दर्जाचे वापरल्यामुळे बरेच ठिकाणी लिकेज होऊन गवारीचे दूषित पाणी पाईपमध्ये शिरुन पिण्याचे पाणी दूषित होवून ते वापरणारे गोरगरीब नागरीक व लहान मुले आजारी पडत आहे.येथील समश्याबद्दल चौकशी व विचारपूस केली असता



संबंधीत अधिकारी उडव उडीचे उत्तर देवून मोकळे होतात.विविध पक्ष व नागरीकांचा मागणीचे निवेदन स्वीकारतात जास्त तसे राहातात.यावर काहीही उपाय योजना किंवा नागरीकांचा सोई सुविधा पुरवत नाही.यासाठी वरीष्ठ अधिकारी,जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणी जिल्हा नगरपरिषद प्रशासन अधिकारी जातीने लक्ष घालून आता पर्यंत दिलेल्या निवेदन व अधिकार्यां मार्फत केलेल्या सुविधा व आता पर्यंत सुविधा नावाखाली खर्चा केलेल्या रक्कम याचे सखोल चौकशी करुन दोषी मुख्याधिकारी व संबंधीत अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाई करण्याचे निवेदन आज जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाधिकारी सोलापूर यांना दिली आहे. या निवेदनावर रिपब्लिकन पक्षाचे सोलापूर जिल्हा चिटणीस सैदप्पा झळकी,रिपाइं दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी रिपाइं मुस्लिम आघाडी दुधनी शहर अध्यक्ष महेदिमिंया जिडगे यांच्या सह्या आहे.जर या मागणीचे दखल संबंधीत अधिकारी घेतली नाही तर रिपाइं कडून नगर परिषद दुधनी समोर धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशाराही यावेळी रिपाइं कडून देण्या आली आहे.

## माझी माती माझा देश अभियानांतर्गत जिल्हास्तरारून सर्व अमृत कलश मुंबई कडे रवाना

सोलापूर/प्रतिनिधीः स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमित्त राज्यात 'मेरी माटी मेरा देश'अर्थात 'माझी माती माझा देश' अभियान सुरू आहे. या अभियान अंतर्गत जिल्हा परिषदेच्या अंतर्गत ११ पंचायत समितीचे अकरा कलश, सोलापूर महानगरपालिकेचा एक कलश व जिल्हा नगरपालिका प्रशासनचा एक कलश अशा पद्धतीने एकूण १३ अमृत कलश घेऊन जाणाऱ्या स्वयंसेवकाच्या वाहनाला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशाधीन शेळकंदे यांच्यासह अन्य मान्यवर व नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक उपस्थित होते.



या अभियानाची सुरुवात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आली. देशासाठी बलिदान दिलेले शहीद जवानांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी आणि त्यांना वंदन करण्यासाठी या अभियान राबविण्यात येत असून त्या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर पालिका प्रशासन यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आलेले होते. या अमृत कलश मध्ये सोलापूर महानगरपालिकेचे एक कलश, सोलापूर जिल्ह्यातील ११ पंचायत समितीचे ११ कलश, जिल्हा नगर पालिका प्रशासनाच्या वतीने एक कलश घेऊन जात आहेत. हे सर्व कलश नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक २७ ऑक्टोबर २०२३ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान येथे मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा.सांस्कृतिक कार्य यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमासाठी मुंबईकडे घेऊन जात आहेत. त्यानंतर अंतिम सोहळा १ नोव्हेंबर २०२३ रोजी नवी दिल्ली येथील कर्तव्यपथावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे.

## पंढरपूर तालुक्याचा दुष्काळी यादीत समावेश करा; काँग्रेस माथाडी विभागाची मागणी

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्य शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी तालुक्यांची यादीतून पंढरपूर तालुक्याला वगळण्यात आले असून वास्तव परिस्थिती पाहता पंढरपूर तालुक्याचा दुष्काळी यादीमध्ये समावेश करावा. अशी मागणी काँग्रेसच्या माथाडी कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटोळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



अशोक पाटोळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंढरपूर तालुक्यांमध्ये यंदाच्या पावसाळ्यात पावसाने दडी दिली असून यामुळे शेतकऱ्यांची पिके वाया गेली आहेत. तर तालुक्यात अनेक ठिकाणी पाणी पातळी खालावल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही उद्भवताना दिसून येत आहे. जून ते सप्टेंबर या महिन्यांमध्ये ५० टक्के पेक्षा कमी पाऊसमान झाल्याचे दिसून येत आहे. तर गेली अनेक दिवसांपासून पावसाने खंड दिल्याने अनेक शेतकऱ्यांची पिके जळून चाललेली आहेत.नवीन पिक लागवडीसाठी शेतकऱ्यांनी लागवड पूर्व तयारी पूर्ण केली असली तरी पावसाचा पत्ता नसल्यामुळे लागवडीचा हंगाम पूर्णपणे ढासळला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळल्याचे दिसून येत आहे.

पंढरपूर तालुक्यातील या वास्तवदर्शी दुष्काळी परिस्थितीचा विचार करून सरकारने व शासनाने या तालुक्याचा दुष्काळी यादीमध्ये समावेश करणे अत्यंत क्रमप्राप्त असतानाही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून तालुक्याला दुष्काळी यादीतून हटवले आहे. यामुळे या तालुक्यातील शेतकऱ्यांना व जनतेला टंचाईग्रस्त सुविधांपासून वंचित राहावे लागणार आहे. याचा विचार करून पंढरपूर तालुक्याचा दुष्काळी यादीमध्ये समावेश करावा आणि दुष्काळाच्या खाईत लोटलेल्या शेतकऱ्यांना सुविधांसह मदतीचा दिलासा द्यावा. अशी मागणी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसच्या माथाडी विभागाचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटोळे यांनी तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

**तात्काळ पिक विमा द्यावा...** राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी जाहीर केलेल्या एक रुपया मध्ये पिक विमा या योजनेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. त्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ तात्काळ द्यावा. म्हणजे दुष्काळी संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्याला थोड्याफार प्रमाणात तरी आर्थिक दिलासा मिळण्यास मदत होईल. अशी मागणी ही निवेदनाद्वारे अशोक पाटोळे यांनी केली आहे.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कार्तिकी यात्रा नियोजनाचा दुरदृष्य प्रणालीद्वारे घेतला आढावा

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. कार्तिकी शुध्द एकादशी गुरूवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी असून, यात्रा कालावधी दि.१४ ते २७ नोव्हेंबर असा राहणार आहे. या यात्रा कालावधीत सुमारे १० ते १२ लाख वारकरी, भाविक येतात. येणाऱ्या भाविकांना सुरक्षा व आवश्यक सोयी सुविधांच्या उपलब्धता च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व मंदिरे समितीने केलेल्या नियोजनाचा आढावा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे आज घेतला.



यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने मंदीर समिती व प्रशासनाकडून वारकरी भाविकांना देण्यात येणा-या सोयी सुविधांबाबत केलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती पालकमंत्री पाटील यांनी जाणून घेतली. यात्रेसाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला शासनाकडून चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाव्यात. दर्शन रांग, दर्शन मंडप या ठिकाणी गर्दी होणार नाही यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी. पोलीस विभागाने वाहतुकीचे योग्य नियोजन करावे. तसेच भाविकांच्या वाहनासाठी पार्किंगची व्यवस्था चांगल्या पद्धतीने करावी. भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभागाने चोख बंदोबस्त ठेवावा. जिल्हा परिषद यंत्रणेने ग्रामीण भागात वारकऱ्यांसाठी त्यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधा अत्यंत काटेकोरपणे दिल्या जातील याची दक्षता घ्यावी. तसेच पोलीस मदत केंद्र ही ठिकठिकाणी सुरू ठेवावेत. पिण्याचे पाणी स्वच्छता व आरोग्य सुविधा भाविकांना उत्कृष्ट मिळाव्यात यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. दि.३ नोव्हेंबर २०२३ रोजी च्या आपल्या संभाव्य पंढरपूर दौऱ्यात कार्तिकी वारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन व मंदिर समितीने केलेल्या नियोजनाचा आढावा घेण्यात येणार असून पंढरपूर शहरात व ग्रामीण भागात भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व सोयी सुविधांची प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी करण्यात येईल, त्या अनुषंगाने प्रशासनाने तयारी ठेवावी अशीही सूचना यावेळी पालकमंत्री पाटील यांनी केली. वारीसाठी नियुक्ती केलेले इन्सिडेंट कमांडर तथा प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी प्रशासनाच्या वतीने तर मंदिर समितीच्या वतीने भाविकासाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी पालकमंत्री महोदयांना दिली.

## मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी करमाळ्यात साखळी उपोषण



करमाळा/प्रतिनिधी : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी व मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा म्हणून आज करमाळा तहसील कार्यालय समोर सकल मराठा समाज व बहुजन समाज यांच्या वतीने साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली या उपोषणाला पाठिंबा म्हणून अनेक पक्ष व संघटना यांनी आपला पाठिंबा दर्शवला या आंदोलनाला पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे साहेब प्रभारी तहसीलदार जाधव साहेब यांनी भेट दिली